अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## पंतप्रधान मोदींनी मुख्यमंत्र्यांची थाप थोपटली

**नाशिक** : पंतप्रधान नरेंमोदी हे शुक्रवारी नाशिकच्या दौऱ्यावर होते. मोदींच्या हस्ते २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी मंचावर असलेल्या पंतप्रधानांच्या खांद्यावरुन शाल घसरली, परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वेळीच सावरली. हे पाहून मोदी हसले आणि त्यांनी शिंदेंच्या खांद्यावर कौतुकाची थाप दिली. शिंदे यांनी अलगद ती झेलली आणि पुन्हा मोदींच्या खांद्यावर ठेवली.



शिंदे यांच्या प्रसंगावधानाने नरेंद्र मोदीही काहीसे भारावले. त्यांनी ती शाल सुरक्षारक्षकांच्या हातात सुपूर्द केली आणि एकनाथ शिंदे यांच्या पाठीवर कौतुकाने थाप दिली. त्यानंतर एकनाथ शिंदेही हसले आणि त्यांनी मोदींना नमस्कार केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाशिकमधील सभेत घराणेशाहीचा उल्लेख करून काँग्रेसला टोला हाणलाच. पण याच कार्यक्रमात एक मजेशीर देवदुर्लभ आपुलकीचा प्रसंग घडला. नाशिकरांच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोदी यथोचित सत्कार केला. पहिल्यांदा उजव्या खांद्यावर शाल पांघरली. त्यानंतर छ.शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट म्हणून दिली. काही क्षणानंतर ती शाल घसरून खाली पडणार होती.तितक्यात मुख्यमंत्र्यांनी स्लीपमधील चाणाक्ष फिल्डरप्रमाणे हुशारी दाखवून ती शाल पकडली. मोदी मनमुराद हसले.

www.surajyadigital.com | शनिवार, दि.१३ जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ९५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# घरफोडी करण्याच्या तयारीतील दोघे अट्टल गुन्हेगार जेरबंद

- ‘पीआय’च्या घरासह दोन घरफोड्यांचा लागला छडा
- दागिन्यांसह सहा लाखांचा ऐवज हस्तगत

सुराज्य/सोलापूर

**सोलापुरात विविध ठिकाणी घरफोड्या करण्यासाठी आलेल्या सराईतील दोघा अट्टल आंतरजिल्हा गुन्हेगारांना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. विशेष म्हणजे या गुन्हेगांराना पकल्यानंतर सोलापूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक अश्विनी श्यामराव भोसले (प्लॉट नं. ५४, पाटीलनगर, विजयपूर रोड, सैफुल) यांच्यासह अन्य एका ठिकाणच्या घरफोडीचा छडाही लागला. पोलिसांनी खाक्या दाखवताच भोसले यांचे घर फोडल्याची कबुली दिली. त्यानंतर या दोघांकडून दागिन्यांसह सहा लाखांचा ऐवज हस्तगत केला. मोहन दौलतराव मुंडे व त्याचा साथीदार सोहेल जलील शेख (वय-२० वर्षे, करबला वेस, दमगान पूरा, अंबाजोगाई, बीड) असे अटक केलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत.**



भोसले या डिसेंबर महिन्यात परगावी गेल्यानंतर चोरट्यांनी बेडरुममधील कपाटातील सहा नग सोन्याच्या बांगडया वजन सुमारे १२० ग्रॅम, रोख रक्कम ३५ हजार रुपये असा एकूण सहा लाख ३५ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन घेऊन पोबारा केला होता. याबाबत त्यांनी विजयपूर नाका पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरटयांविरुध्द गुन्हा दाखल केला होता. विजयपूर रस्त्यावरील पाटीलनगर येथील अन्य एका घटनेत फिर्यादी सुरज गणपतराव पाटील (रा.३४७/१, समर्थ बंगला, सवेरानगर, गोविंद मेडिकलच्या मागे सैफुल विजयपूर रोड, पुणे) यांचे वडील हे मुलास, सुनेस भेटण्यासाठी दि. १७ डिसेंबर रोजी पुणे येथे घर बंद करुन गेले. गावावरुन परत आले, तेव्हा त्यांचे घराचे मुख्य दरवाज्याचा कडी कोयंडा तुटलेला दिसला. घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. घरातील लोखंडी कपाट उचकटून, एक सोन्याची पिळयाची अंगठी, चांदीचे पैजन, शिक्के, रोख रक्कम असा एकूण ३२ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरीस गेला होता. या संदर्भात त्यांनी विजयपूर नाका पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरटयांविरुध्द गुन्हा दाखल केला होता. या गंभीर स्वरुपाचे घरफोडीचे दोन्ही गुन्हे उघडकिस आणण्यासाठी पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या सूचनेनुसार पोलीस उपायुक्त गुन्हे डॉ. दीपाली काळे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांनी गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी, अंमलदार यांचेसह घटनास्थळास भेट देऊन संबंधित गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेने कसून तपासाला सुरुवात केली. त्यानंतर शनिवार, दि.६ डिसेंबर रोजी सहायक पोलीस निरीक्षक दादासो मोरे यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार इम्रान जमादार यांना मिळालेल्या माहितीनुसार गुन्हेगार मोहन दौलतराव मुंडे (क्रांतीनगर, अंबाजोगाई) त्याचा आणखी एक साथीदार असे दोघांनी मिळून केली आहे.

तसेच आरोपी पुन्हा सोलापूर शहरात घरफोड्या करण्यासाठी आले असून, जुना विजयपूर नाका कंबर तलाव परिसरातील पुतळ्याजवळ भिंतीजवळ बसल्याची माहिती मिळाली. त्याअनुषंगाने पोलीस उप निरीक्षक अल्फाज शेख, इम्रान जमादार, विनोद रजपूत यांनी कौशल्याने मिळवलेल्या तांत्रिक माहितीची तसेच मिळालेल्या बातमीची खात्री करुन, सदरचे दोन्ही गुन्हे हे रेकॉडवरील सराईत आंतरजिल्हा गुन्हेगार- असे दोघांना मोठया शीतफिने अटक केली.

पोलीस आयुक्त डॉ राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त गुन्हे डॉ. दीपाली काळे, सहायक पोलिस आयुक्त गुन्हे प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरिक्षक दादासो मोरे, पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख, त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार संदीप जावळे, विनोद रजपूत, इम्रान जमादार, राजकुमार पवार, बापू साठे, सुभाष मुंडे, सतीश काटे, बाळासाहेब काळे, सायबर पो.स्टे कडील अविनाश पाटील, प्रकाश गायकवाड, राठोड, वसीम शेख, शेख यांनी ही कामगिरी केली.

### खाक्या दाखवताच दिली कबुली...

**या दोन्ही आरोपीकडून कौशल्याने चौकशी केली असता दि. १७ डिसेंबर २०२३ रोजी सोलापूर शहरात रात्रीच्या वेळी विजापूर रोड, सैफुल पसिसरातील सुरज गणपतराव पाटील, अश्विनी श्यामराव भोसले यांच्या घराची कुलूपे लोखंडी कटावणीने तोडून, घरातील सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरुन नेल्याची कबुली दोन्ही आरोपीनी दिली. चोरीस गेलेला सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ६ लाख ३७ हजार २०० रुपयोचा मुद्देमाल जप्त करून २ गुन्हे उघडकीस आणण्यास गुन्हे शाखा पोलिसांना यश आले आहे.**

## शेजारच्याच महिलेनेच चोरले मौल्यवान दागिने

स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**साडेसोळा लाखांचा मुद्देमाल हस्तगत**

सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट शहरातील खासबाग भागतील फिर्यादीचे राहत्या घरामध्ये दि. १५ डिसेंबर २०२३ ते २१ डिसेंबर २०२३ दरम्यान शेजारच्या महिलेने प्रवेश करून किचन घरातील लोखंडी कपाटात ठेवलेल्या २७ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, ५६ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिणे व रोख रक्कम ५० हजार घेऊन पसार झाली होती. या संदर्भात अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी कसून तपास करत १६ लाख ७४ हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

अक्कलकोट येथे झालेल्या घरफोडी संदर्भात स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक शशिकांत शेळके, त्यांच्या पथकास गुन्हयाचे ठिकाणी भेट देवून गुन्हा उघडकिस आणण्याबाबत मार्गदर्शनपर सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने शशिाकंत शेळके यांच्या पथकाने कसून तपासाला सुरुवात केली. फिर्यादीच्या शेजारी राहत असलेल्या महिलेने चोरी केली आहे. सहायक पोलीस निरीक्षक शशीकांत शेळके यांच्या पथकाने या महिलेस ताब्यात घेऊन चौकशी केली. प्रथम उडवा उडवीचे उत्तरे दिली. मात्र चौकशी तिने गुन्हा केल्याची कबुली दिली. या महिलेकडून चोरीस गेलेल्या सोन्याच्या पाटल्या, राणीहार,



गंठण, मिनी गंठण, लॉकेट, बांगड्या, कानातील फुले झुबे, मोतीचूर अंगठी, नाकातील नथ असे सोन्याचे दागिने व चांदीचे पैंजन व जोडवे असे दागिने व ५० हजार रोख रक्कम असे एकूण १६ लाख ७४ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ही विशेष कामगिरी पोलिस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांचे नेतृत्वाखाली सहायक पोलीस शशिकांत शेळके, पीएसआय राजेश गायकवाड, सहायक फौजदार नारायण गोलेकर, प धनाजी गाडे, मोहन मनसावाले, महिला पोलीस अंमलदार मोहिनी भोगे, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, अक्षय डोंगरे, यश देवकते, समीर शेख यांनी केली.



### पंतप्रधान मोदींनी काळाराम मंदिरात राबवली स्वच्छता मोहिम

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी नाशिकचा दौरा केला. यावेळी त्यांनी गोदावरीच्या काठावर असलेल्या श्री काळाराम मंदिरात प्रभू रामाचे दर्शन घेतले. स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंदिर परिसरात पोछा मारुन स्वच्छता मोहीमही राबवली. काळाराम मंदिरात दर्शन घेतल्यानंतर मोदी यांच्या हस्ते नाशिक इथे राष्ट्रीय युवा महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले.

## अनैतिक संबंधाच्या संशयावरुन युवकाचा डोक्यात दगड घालून खून

**सहा तासाच्या आत आरोपीला जेरबंद करण्यात पोलिसांना यश**

सुराज्य/मंगळवेढा

शहरानजीक वीट भट्टीवर कामावर असलेल्या आपल्या पत्नीचा अन्य एका तरुणाशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरुन त्या स्त्रीच्या पतीने २५ वर्षीय तरुणाचा झोपेत डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी अर्जुन गोरख शेगर (पळसदेव, इंदापूर) याला पोलिसांनी अवघ्या सहा तासात अटक केली आहे. जुना बोराळे नाक्याजवळ मकानदार यांची वीटभट्टीत मयत ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली महादेव शिंदे (वय-२५, माळशिरस) कामास होता. यातील आरोपी अर्जुन गोरख शेगर, त्याची पत्नीही तेथे कामास होती. मयत, आरोपी हे नातेवाईक असून,आरोपीची पत्नी,



मयत यांच्यात अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरुन दि.११ रोजी सकाळी ७ वाजता मयत हा घराच्या अंगणात झोपलेल्या ठिकाणी त्याच्या डोकीत उजव्या बाजूला मोठा दगड घालून खून केल्याची फिर्याद रतन ऊर्फ रुपाबाई महादेव शिंदे (माळशिरस) यांनी दिल्यानंतर पोलिसांनी केवळ सहा तासात आरोपीला जेरबंद केले.

## मुलगी झाली म्हणून विवाहितेचा छळ; पती बेपत्ता

**सोलापूर** : पत्नीशी किरकोळ वादावरुन शिवीगाळ करीत मारहाण केल्याप्रकरणी पतीविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी अपर्णा रमण साबळे (वय-३६, कोनापुरे चाळ, फॉरेस्ट, बुद्ध विहार) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरुन पती रमण सातप्पा साबळे (लक्ष्मी पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी अपर्णा साबळे या सासरी नांदत असताना किरकोळ वादविवाद करुन रमण साबळे याने शिवीगाळ करीत मारहाण केली. मुलगी झाली म्हणून मारहाण करुन तू मला पसंत नाही, केवळ हुंडा मिळावा, म्हणून तुझ्याशी लग्न केले आहे. तू मला कार घेण्यासाठी माहेरहून पाच लाख रुपये घेऊन ये, नाहीतर तू मला बोलायचे नाही, असे म्हणत दमदाटी केली. रमण साबळेने फिर्यादी, फिर्यादीच्या नातेवाईकांना व्हॉट्सअपवर मला आई, भाऊ, बहीण पत्नी, मुलगी यांच्यासोबत राहायचे नाही. मी माझी सोय केली आहे. माझे दुसऱ्या मुलीवर प्रेम आहे. मी तिच्यासोबत राहणार आहे. मी सोलापूरला येणार नाही, असे मेसेज पाठवले. त्याच्या अशा वागण्यामुळे फिर्यादींना शारीरिक व मानसिक त्रास होत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास सहा.पो. नि.बनसोडे करीत आहे.

## रुग्णालयातून ५० हजारांची चोरी

**सोलापूर** : गुरुनानक चौक येथील जिल्हा रुग्णालयातील महिला रुग्णालय विभागात अज्ञात चोरट्याने बेसिन, टॉयलेटमधील पाण्याचे एकूण ६० तोट्या व बाथरूम मधील एकूण ४० वॉल असे ५० हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेल्याची घटना दि.१० ते ११ जानेवारी दरम्यान घडली. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस मोरे हे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सध्या एक कलमी कार्यक्रम सुरू आहे !

कल्याण
256-38-134

मुंबई
345-23-238

## भांडण का सोडविले म्हणून एकास तलवारीने मारहाण

**चौघांवर गुन्हा दाखल**

सुराज्य/सोलापूर


भांडणांमध्ये सोडवा-सोडवी का केली असे म्हणत लाथा बुक्क्यांनी मारहाण करून तलवारीने मारून जखमी केल्याची घटना दि. ११ जानेवारी रोजी रात्री सव्वादहा वाजण्याच्या सुमारास औसेवस्ती येथील जय सिद्धार्थ मंडळ येथे घडली.

याप्रकरणी बलभीम नागनाथ भडकुंबे (वय-२८, औसेवस्ती) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून आकाश मुकेश सिद्धगणेश, मुकेश सिद्धगणेश, आकाशचा चुलत भाऊ, एक मित्र यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हे मित्र आदर्श आठवले असे दोघांना फिर्यादी यांच्या घराजवळ राहणारा, ओळखीचा आकाश सिद्धगणेशने फिर्यादीजवळ येऊन तुम्ही परवा आमच्या भांडणात सोडवा-सोडवी का केली, असे म्हणून शिवीगाळ करीत मारहाण केली. तलवारीने फिर्यादी, फिर्यादीच्या मित्राला मारहाण करून जखमी केले. संशयित आरोपी सिद्धगणेश, आकाश याचा चुलत भाऊ, त्याचा एक मित्र साथीदार असे फिर्यादी, फिर्यादीच्या मित्राला तुम्ही आमच्या नादी लागू नका. असे म्हणून दमदाटी करून मारहाण केली.

## मराठमोळ्या गायकवाड दाम्पत्यास मिळाला अयोध्येतील श्रीराम पूजेचा बहुमान

सुराज्य/मुंबई

**अयोध्येत प्रभू श्री राम यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते हा प्राणप्रतिष्ठा सोहळा होत असून दिग्गजांचीही उपस्थिती आहे. तब्बल ११ हजार व्हीआयपींची उपस्थिती सोहळ्याला असणार आहे. या दिवशी प्रभू श्रीराम यांच्या पुजेचा मान देशभरातील ११ दाम्पत्यांस देण्यात आला आहे. त्यामध्ये, धाराशिव जिल्ह्यातील काकंब्रा तालुक्यातील मराठमोळ्या गायकवाड दाम्पत्यासही पुजेचा मान मिळाला आहे.**



अयोध्येत अठरापगड जाती, आणि सर्वधर्मसमभाव जपत हा दैदिप्यमान सोहळा होत आहे. त्याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे धाराशिवला जिल्ह्यातील गायकवाड कुटुंबास मिळालेला पुजेचा बहुमान. धाराशिव जिल्ह्यातील काकंब्रा येथील गायकवाड दाम्पत्य प्राणप्रतिष्ठा सोहळयात महाराष्ट्राचं प्रातिनिधिक योगदान देत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. २२ जानेवारी रोजी देशातील ११ जोडप्यांच्या हस्ते प्रभू श्री राम यांची महापूजा होणार आहे. त्यात, महाराष्ट्रभूमीतील गायकवाड पती-पत्नीला हा मान मिळाला आहे. या महापूजेसाठी भटक्या विमुक्त समाजातील (कैकाडी समाजाचे) महादेवराव गायकवाड हे सपत्नीक बसणार आहेत.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी याची करताना, प्रभू श्रीरामांनी शबरीमातेकडील बोरं खाल्ले होते, याची आठवण सांगितली. काही प्रसंग.. क्षण आयुष्य अजरामर करतात. असाच एक क्षण श्री तुळजाभवानीच्या अधिष्ठानाने पुण्यभू असलेल्या तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा गावचे महादेव गायकवाड यांच्या आयुष्यात आला आहे.

त्यांच्या कार्याने त्यांना बहुमान मिळवून दिला. गायकवाड हे निवृत्त प्राध्यापक आहेत. त्यांचे कार्य इतके समृद्ध आणि सामाजिक उन्नतीचे आहे की त्यामुळे त्यांना, प्रभू श्रीरामाच्या पूजेचा मान मिळाला. अयोध्येतील मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात पूजेसाठी बसण्याचा मान भारतातील ११ कुटुंबाना मिळाला. त्यात महादेवराव गायकवाड उभयता सहभागी होणार आहेत.